राज्यातील अल्पसंख्याक उमेदवारांकरिता
रोजगारभिमुख प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजना
राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक: अविवि-२०१६/प्र.क्र.१७५/का-९,**
**मंत्रालय, मुंबई-४००० ३२,**
**दिनांक: ३१ मार्च, २०१८.**

वाचा :- १) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. क्रमांक: अविवि-२००९/ प्र.क्र.४१/०९/का-१, दि. १५ ऑक्टोबर, २०१०

२) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. क्रमांक: अविवि-२०१५/ प्र.क्र.१२६/का-९, दि. ४ डिसेंबर, २०१५.

३) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्र. कौविउ-२०१५/प्र.क्र. १९५/ रोस्वरो-१, दि. ०३ ऑगस्ट, २०१५.

४) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्र. कौविउ-२०१५/प्र.क्र. १२२/रोस्वरो-१, दि. ०२ सप्टेंबर, २०१५.

प्रस्तावना :-

राज्यातील अल्पसंख्याक समाजातील होतकरु युवक / युवतींना व्यवसायभिमुख शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देवून त्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या उद्देशाने अल्पसंख्याक विभागाने उपरोक्त संदर्भ क्र.२ मध्ये नमूद दि. ०४ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सुधारित रोजगारभिमुख प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजना लागू केली आहे. राज्यातील युवक / युवतींचे कौशल्य विकासव्दारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग,सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार/ स्वंयरोजगार क्षेत्रात संधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबविण्यास कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या संदर्भ क्र. ४ मध्ये नमूद दि. ०२ सप्टेंबर २०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग आणि अल्पसंख्याक विकास विभाग या दोन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अनुक्रमे प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान आणि रोजगारभिमुख प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजना या दोन्ही योजनांचा उद्देश व अभ्यासक्रम बहुतांशी समान आहे. कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये एकसुत्रता रहावी आणि कौशल्य विकास संदर्भातील योजनातील व्दिरुक्तीस प्रतिबंध करण्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागाच्या रोजगारभिमुख प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजना या योजनेची अंमलबजावणी कौशल्य विकास व उद्योजकता विभागातंर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थामार्फत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक ०२.०९.२०१५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ९.१ मध्ये राज्यातील विविध मंत्रालयीन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये एकसुत्रता राहण्याच्या दृष्टीने विविध मंत्रालयीन विभागाने कौशल्य विकास कार्यक्रमाकरिताचा निधी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेकडे वर्ग करण्याच्या सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन अल्पसंख्याक विकास विभागाची रोजगारभिमुख प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजना ही योजना कौशल्य विकास व उद्योजकता विभागातंर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेमार्फत राबविण्यास या शासन निर्णयाव्दारे मंजुरी देण्यात येत आहे.

२. कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान या योजनेतंर्गत अल्पसंख्याक समुहातील उमेदवारांना विविध क्षेत्राशी संबंधित कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येईल. त्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या रोजगारभिमुख प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजना या योजनेची तरतुद कौशल्य विकास व उद्योजकता विभागातंर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था या नोडल एजन्सीला आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांचे मार्फत संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई अल्पसंख्याक विकास विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल. अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाना (महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था यांचेकडे सुचीबध्द झालेल्या आस्थापना / समुह ) प्रशिक्षण खर्चाच्या रकमेची प्रतिपुर्ती महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेमार्फत करण्यात येईल. त्याव्यतिरिक्त प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानातंर्गत देखील अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

३. सदर कौशल्य विकास प्रशिक्षण देताना ज्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना प्राथम्य देण्यात येईल. यासाठी स्वयंरोजगार असलेल्या पालकांच्या उत्पन्नाचे स्वयंघोषित प्रमाणपत्र (प्रपत्र- अ ) सादर करणे आवश्यक राहील. या योजनेतंर्गत अल्पसंख्याक समुहातील मुलींसाठी ३०% जागा राखीव ठेवण्यात येईल. एखाद्या अल्पसंख्याक समाजातील पात्र मुलींची संख्या कमी असल्यास अल्पसंख्याक समाजातील मुलांसाठी त्या जागा समायोजित करण्यात येतील.

४. रोजगारभिमुख प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजना या योजनेचा लाभ देण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था या नोडल एजन्सीकडून करण्यात येईल.

रोजगारभिमुख प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजना या योजनेच्या अंमलबजावणीची संपुर्ण जबाबदारी कौशल्य विकास व उद्योजकता विभागातंर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था या नोडल एजन्सीची राहील.

५. रोजगारभिमुख प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी होणारा खर्च मागणी क्र. झेड ई-१, मुख्यलेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०९) अल्प कालावधीतील व्यवसायावर आधारित पाठय-क्रमांकरिता सहायक अनुदान (२२३५-ए-१५१) या लेखाशिर्षाखाली तरतुदीतून भागविण्यात येईल. सदर योजनेसाठीची सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील रु.१.६० कोटी इतकी तरतूद महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

उपरोक्त शासन निर्णय कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११५५७१०५२१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.03.31 18:41:15 +05'30'

**(दि.मा.सोनवणे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) मा. मंत्री (अ.वि.) / मा. राज्यमंत्री (अ.वि.) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
५) प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय
६) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
७) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता,१ /२ ) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०) सर्व विभागीय आयुक्त

११) सर्व जिल्हाधिकारी
१२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१३) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, कफ परेड, मुंबई
१५) संचालक, तंत्रशिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६) संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी)
२०) निवडनस्ती.

## प्रपत्र-अ

राज्यातील अल्पसंख्याक उमेदवारांकरिता सुधारीत रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात मुस्लिम, खिश्चन, बौध्द, शीख, पारसी व जैन या अल्पसंख्याक समाजांमधील विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रशिक्षणासंदर्भात कुंटुंबाच्या उत्पन्नाचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.

१) मी............................पिता........................राहणार (संपूर्ण पत्ता...............................) याव्दारे शपथपूर्वक जाहिर घोषणा करतो की :-

अ) मी महाराष्ट्राचा नागरीक आहे.

ब) माझ्या कुटुंबाचे सर्व स्त्रोतातून मिळून एकुण वार्षिक उत्पन्न रुपये................................(अक्षरी रुपये.....................................................) इतके आहे.

क) मी घोषित करतो /करते की, माझे वडील / आई/ दोघेही* हे माझ्या कुंटुबातील कमावते सदस्य ....................................आहेत.

२) मी प्रमाणित करतो की, मी दिलेली वरील माहिती खरी आहे.

३) मी सादर केलेली उपरोक्त माहिती खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास मला देण्यात आलेले अर्थसहाय्य दंडनिय व्याजासह माझ्याकडून वसूल करण्यात यावे व या कृत्यासाठी मी माझ्याविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यासाठी पात्र असेल.

पालकांची स्वाक्षरी...........................

नांव.............................................

विद्यार्थ्याची स्वाक्षरी..........................

नांव...............................................

*लागू नसलेले खोडावे.